महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर
*Government Medical College, Chandrapur*
Govt. T.B. Hospital Campus, Ramnagar, Chandrapur - 442401, M.S. (INDIA)
Telephone No:- 07172- 277103, 277106, 252522
Website : www. gmcchandrapur.org
Fax No:- 07172- 277104
Email – gmcchandrapur@gmail.com

जा.क्र.शावैमचं/मध्यवर्ती भांडार/खानावळ व उपहारगृह/ ७९६२ /१८.
दिनांक २८/०८/२०१८

## खानावळ व उपहारगृहाकरीता
## खुले दरपत्रक

शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, चंद्रपूर येथील विद्यार्थ्यांकरीता महाविद्यालयाच्या परिसरामध्ये खानावळ व उपहारगृहाकरीता खालील अटिं व शर्तीचे अधिन राहुन इच्छूक असल्यास मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर यांचे नावाने आपले दरपत्रके व आवश्यक गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन यांचे प्रमाणपत्र, पॅन कार्ड,जी.एस.टी.व वैद्यकीय प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सिलबंद पाकिटामध्ये दिनांक १७/०९/२०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाने आपले दरपत्रके प्रत्यक्ष या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. विहीत दिनांक व वेळेनंतर प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणास्तव स्वीकारले जाणार नाही. सदर निविदा दरपत्रकातील दर हे प्रति दिवस प्रति विद्यार्थी हया प्रमाणे सर्व करासह नमुद केलेले असावेत. सदर निविदा दिनांक १८/०९/२०१८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता उघडण्यात येईल.

**अटी व शर्ती:-**

- विद्यार्थ्यांना दररोज सकाळी ७.०० ते ९.०० या दरम्यान दोन प्रकारचे नाश्ताचे पदार्थ देण्यात यावे. नाश्त्यामध्ये पोहा, उपमा, इडली, सांबार वडा, उत्तपा, डोसा, समोसा व आलु वडा इ. प्रकार असावे.
- तसेच दररोज सकाळी ७.०० ते ९.०० व दुपारी ४.०० ते ५.०० च्या दरम्यान चहा/कॉफी/दुध देण्यात यावे.
- दररोज दुपारचे जेवण १२.०० ते ३.०० या दरम्यान व रात्रीचे जेवण ८.०० ते १०.०० दरम्यान असावे. जेवणात दोन प्रकारच्या भाज्या (सुकी व रस्सेदार), डाळ/वरण, भात, चपाती, पापड, लोणचे, सलाड (कांदा, गाजर, बीट, काकडी) व दही यांचा समावेश असावा.
- प्रत्येक रविवारी एकवेळ दोन्ही प्रकारचे (शाकाहारी व मांसाहारी) खास जेवण देण्यात यावे. शाकाहारी जेवणात पनीर, जीरा भात, डाळ, चपाती, पापड, सलाड, दही व एक गोड पदार्थ इ.चा समावेश असावा आणि मांसाहारी जेवणात अंडी/चिकण/मटण/मासे, जीरा भात, डाळ, चपाती, पापड, सलाड इत्यादी असावे.
- विद्यार्थ्यांच्या सोईप्रमाणे बदल आवश्यक असल्यास विद्यार्थी प्रतिनिधीच्या सुचनेप्रमाणे त्यावेळेत जेवण पुरवावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत आपण निर्धारित वेळेत चहा, नाश्ता व जेवण पुरविणे बंधनकारक राहील. जेवण पोटभर देण्यात यावे. तसेच अन्नाचा दर्जा उत्तम राहणे गरजेचे आहे, त्याकरीता महाविद्यालयीन आहार समिती मार्फत अन्नाचा दर्जा वेळोवेळी तपासण्यात येईल.
- स्वयंपाकाची व्यवस्था कॅन्टीन परिसरातच करावी लागेल. विद्यूत पुरवठा देयक कंत्राटदराला भरावे लागेल. कॅन्टीनचे भाडे बांधकाम विभाग यांनी नियमाप्रमाणे नेमून दिलेल्या दराने भरावे लागेल. स्वयंपाकासाठी व भोजनासाठी लागणारे फर्निचर, भांडीकुंडी, खाद्यपदार्थ, आचारी, मदतनीस, जेवण वाढणे व सिलेंडर गॅस इत्यादीची व्यवस्था कंत्राटदारास स्वतः करावी लागेल.
- खानावळीमधील भांडीकुंडी व भोजन परिसर स्वच्छ ठेवणे ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील.
- विद्यार्थ्यांसाठी पिण्याकरीता शुध्द पाण्याची व्यवस्था कंत्राटदराला स्वतः करावी लागेल.विद्यार्थ्यांकडून पैसे वसूल करण्याचे काम हे कंत्राटदाराचे राहील, त्यास महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहणार नाही. भोजन पुरेसे व उत्तम दर्जाचे असावे. भोजनातील पदार्थ कमी प्रतीचे /भेसळयुक्त निदर्शनास आल्यास अथवा दुषित भोजनामुळे/अस्वच्छतेमुळे भोजन घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जिवास/ आरोग्यास होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी कंत्राटधारकाची राहील. अन्न व औषधी प्रशासनाचे धोरणानुसार पुरवठादार कार्यवाहीस पात्र राहील.

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय
चंद्रपूर